
# छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९४५ । वर्ष २३ अंक १०।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३१ अंक १२)
वार्षिक वर्गणी ₹ २५०। मूल्य ₹ २५। पृष्ठे २८


ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!

विद्यार्थी विशेषांक



या पद्याची चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

# आज प्रचीती द्या!



गिरिकुहरातिल गर्द बनातिल सिंहाच्या छाव्यांनो,
तिमिरपुरातिल कृष्णघनातिल तेजस्वी ताऱ्यांनो,
प्रलयंकर शक्तीची तुमच्या आज प्रचीती द्या
तुमच्या शुभकर सामर्थ्याची आज प्रचीती द्या ।। ध्रु.।।

मूक मनांच्या कारागारी धुमसत जी चिनगारी
वीज होउनी कोसळु द्या ती उद्धत अंधारी
त्या भस्मातुन बहरुन येइल हिरवा स्वर्ग उद्या ।। १।।

शतकांपूर्वीची जयगीते अजुनि घुमत कानी
शतकांपूर्वी अखिल धरेला क्षेम दिले आम्ही
ते सळसळते पौरुष फिरुनी नसांत वाहू द्या ।। २।।

पवित्र मूर्ती प्रिय आईची दुभंग परि झाली
अमित संपदा अतुल वैभवे कुटिलांनी लुटली
गतकालाचे विषाद गौरव भविष्य घडवू द्या ।। ३।।

सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमात्र येथे
सर्वार्थांनी रत्नवंत हो क्षेत्रक्षेत्र येथे
या भूमीला सृजनांची नभपंखी स्वप्ने द्या ।। ४।।

समर्पणाची हाक जयांच्या हृदयाला कळली
अजिंक्य झाले राष्ट्र तयांचे अभेद्य बलशाली
सार्थकतेच्या परिसाने त्या जीवन उजळू द्या ।। ५।।

– वाचस्पती स्वर्णलता भिशीकर

**पद्याचा अर्थ :** सदर पद्यातून 'आपल्या मातृभूमीचे गतवैभव मिळवून देण्यासाठी स्वत:मधील सकारात्मक शक्तीचे सामर्थ्य जगाला दाखवून द्या', असे कुमारांना आवाहन केले आहे. अशा कुमारांना कवयित्री निडर अशा सिंहाच्या छाव्याची उपमा देतात. हे कुमार अंधारात प्रकाश दाखवणारे जणू तेजस्वी तारे आहेत. कवयित्री त्यांना उद्देशून म्हणतात, 'ठिणगीच्या स्वरूपात असलेली, तुमच्या मनात दबलेली सुप्त अस्मिता जागी करण्याची वेळ आज आली आहे. जिथे-जिथे अनिष्ट रूढी, परंपरा, दहशतवादाचा अंधकार माजला आहे; तिथे-तिथे कधी आत्मशक्तीच्या तर कधी आत्मसमर्पणाच्या जोरावर प्रहार करण्याची वेळ आज आली आहे. शतकांपूर्वी ही मातृभूमी सुजलाम-सुफलाम होती. तिच्या यशाची, गौरवाची गीते आजही आसमंतात भरून आहेत. काळाच्या ओघात अनेकांच्या आक्रमणांमुळे तिचे वैभव लयास गेले आहे. तिचे गतवैभव तिला प्राप्त करून देणे, हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी तुमच्यातील सामर्थ्याला विधायक कृतीची जोड द्या. आकाशाला गवसणी घालणारी भव्य स्वप्ने तुम्ही पाहा. प्रत्येक क्षेत्रात नवे नवे प्रयोग, संशोधन करून स्वत:बरोबर देशाला समृद्ध करा. त्यागाच्या सामर्थ्यावर राष्ट्र उभे राहते. ज्या-ज्या वेळी राष्ट्रासाठी त्याग केला गेला ते-ते राष्ट्र बलशाली झाले. त्यांच्यावर कुणी आक्रमण करू शकले नाही, असा इतिहास सांगतो. राष्ट्राला बलशाली करण्यासाठी पुनश्च एकदा भौतिक सुखाचा त्याग करण्याची वेळ आली आहे. 'कशासाठी जगावे' आणि 'कसे जगावे' हे कळले की तुमच्या जीवनाचे सार्थक होईल,' असा विश्वास कवयित्री व्यक्त करते.

ॐ
इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९४५। वर्ष २३ अंक १०
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३७२ वा अंक, वर्ष ३१ अंक १२)
प्रकाशन दिनांक – सौर १० आषाढ, शके १९४५/१ जुलै २०२३

## विद्यार्थी विशेषांक

## अंतरंग

२. पद्य... **आज प्रचीती द्या!*** – वाच. स्वर्णलता भिशीकर
४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी
**मनोगत** – विद्यार्थी संपादक मंडळ
५. कथा... **नव्या युगातील 'इ-जंगल'*** – चि. सर्वेश बकाल
७. कविता... **व्यथा चित्त्याची!** – चि. सोहम खपली
८. ललित... **पक्ष्यांच्या जगाची सफर*** – कु. ईशानी फडके
१०. वाचलेच पाहिजे असे काही...**मनेर मानुषेर इंद्रजाल** – कु. स्वामिनी हर्षे
११. कविता... **कविता काही सुचत नाही!*** – कु. प्राजक्ता नाईक
१२. ललित... **पाऊस आणि मी** – कु. शर्वरी कोकणे
१३. रसग्रहण... **संतश्रेष्ठ नामदेव महाराज!** – चि. मेधज करंबेळकर
१५. प्रेरणादायी... **अभिनयाच्या क्षेत्रातील मुशाफिरी** – चि. मिहीर गोडबोले
१८. लेखमाला... **गप्पा आपल्या देशाच्या! – ७ गाथा खाद्यसंस्कृतीची** – कु. ईशानी फडके
२१. माहितीपर... **Chat GPT चे तंत्र** – चि. मेधज करंबेळकर
२३. कथा... **युगपुरुषांचे स्वप्न** – चि. साकेत शेठ
२७. **शब्दशोध**
**याशिवाय :** कविता – पाककृती, विशेष वार्ता (१७), उपक्रमांचा आढावा* (२०), हसा हसा... (२२), वर्गोद्दिष्ट स्पर्धा*, प्रतिसादी वाचकवीर (२६)
**पानांखालील ओळी :** **काव्यपंक्ती** - गुरुविषयी कृतज्ञता..., पावसाविषयी... **स्फुटं** – उखाणे

अवश्य वाचा... पाहा... ऐका... * **या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.** त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करा.

**मुखपृष्ठाविषयी :** उन्हाळ्याच्या सुट्टीत अलिबागला निसर्गाच्या सान्निध्यात जाण्याचा योग आला. परमेश्वराची अद्भुत किमया असणारा तो निसर्ग आणि त्यातून डोकावणाऱ्या कौलारू घराचं हे दृश्य, अतिशय विलोभनीय होतं. ते मनावर ठसलं आणि त्यातून हे चित्र साकारलं आहे. **– कु. मुग्धा जाधव** (इ. ७ वी), कराड

संपर्क पत्ता : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५ संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org
इ-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

छात्र प्रबोधन युट्यूब चॅनेल लिंक – सभासद व्हा!
https://youtube.com/@user-rk8py6zj7f

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

संपादक, प्रकाशक, मुद्रक
महेन्द्र सेठिया
मानद संपादक : शैलजा देशमुख
संपादक मंडळ
वाच. कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन, स्वाती ताडफळे, मल्हार अरणकल्ले
कार्यकारी संपादक
शिल्पा कुलकर्णी
साहाय्यक कार्यकारी संपादक
वैशाली दीक्षित
विद्यार्थी संपादक मंडळ
कु. ईशानी फडके, कु. स्वामिनी हर्षे, चि. मेधज करंबेळकर
मुखपृष्ठ : कु. मुग्धा जाधव
चित्रकार : चि. रुद्र महाबळेश्वरकर, कु. दिव्या पंडित, कु. जान्हवी तायडे, चि. अनुराग शेगोकार

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
वार्षिक : ₹ २५०, द्वैवार्षिक : ₹ ५००,
त्रैवार्षिक : ₹ ७००, दशवार्षिक : ₹ २२००,
इ-अंक वार्षिक वर्गणी : ₹ १००
(दिवाळी अंक सोडून)
या अंकाची किंमत : ₹ २५/–
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ५० जादा

**पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणीसाठी**
**jpprakashane.org**
या संकेतस्थळाला भेट द्या!!

चेक/डी.डी. 'ज्ञान प्रबोधिनी' अथवा 'Jnana Prabodhini' याच नावाने काढावा. सोबतच्या क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन/NEFT ने वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

SCAN HERE TO PAY
WITH ANY BHIM UPI APP
JNANA PRABODHINI

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!

वार्षिक देणगीदार - ➤ श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे ➤ श्री. अनिल पालकर, सातारा ➤ श्री. सतिशचंद्र गोरे, पुणे ➤ श्री. गौरव मोडक, ठाणे ➤ डॉ. विकास हरताळकर, हरताळकर हॉस्पिटल, चोपडा, जि. जळगाव ➤ श्री. अनिरुद्ध शहापूरकर

**प्रिय प्रबोधकांनो,**

संवाद

सौर आषाढ/जुलैचा छात्र प्रबोधनचा 'विद्यार्थी विशेषांक' तुमच्यापर्यंत पोहोचवताना विशेष आनंद होतो आहे. विद्यार्थ्यांच्या साहित्याने व चित्राने नटलेल्या अंकाचे संपादन देखील कु. ईशानी, कु. स्वामिनी व चि. मेधज या तीन विद्यार्थ्यांनी केलं आहे. त्याबद्दल या तिघांचे मन:पूर्वक अभिनंदन! इ. १० वीत उन्हाळी सुट्टीत या तिघांनी जवळजवळ २ महिने झोकून देऊन, मनापासून, चिकाटीने, जबाबदारीने या विशेषांकाचं काम पूर्ण केलं. अंक छपाईचे सर्व टप्पे समजून घेत, कधी निरीक्षणातून तर कधी सहवासातून या तिघांनी शिकण्याची तयारी ठेवत, संपादकीय विभागातील सदस्यांबरोबर काम केलं. त्यातून **विद्यार्थी विशेषांक** आकाराला येत गेला! संपादक मंडळाबरोबरच या अंकातील विद्यार्थी लेखक - चित्रकारांचं मनापासून अभिनंदन आणि कौतुक!

संपादक मंडळातील ईशानी ९९% गुण मिळवून यंदा इ. १० वी उत्तीर्ण झाली, तर कला शाखेतील कु. स्वामिनी ९३% गुण मिळवून इ. १२ वीची परीक्षा यंदा उत्तीर्ण झाली. असं लौकिक यशदेखील आवश्यक असतंच; पण त्यातच अडकून न पडता अनुभवांमधून समृद्ध होणं ही तितकंच महत्त्वाचं असतं. याचे उत्तम उदाहरण या दोघींच्या रूपात दिसत आहे. याचा विशेष आनंद वाटतो. शालेय, क्रमिक शिक्षण जेवढं महत्त्वाचं असतं तेवढंच हे अनुभवातून मिळालेलं शिक्षण देखील महत्त्वाचं असतं! असे वेगवेगळे अनुभव घेत समृद्ध होण्याच्या संधी 'छात्र प्रबोधन' त्यांच्या प्रबोधकांना नेहमीच देत असतं. **प्रबोधन विकासिका** या विद्यार्थ्यांसाठीच्या स्वयंविकासाला प्रेरणा देणाऱ्या वार्षिक उपक्रमातील प्रत्यक्ष कार्यशाळा नुकतीच उत्साहात पार पडली. त्याआधी **ऐपावाक** (ऐका-पाहा-वाचा-करा) या **मे महिन्यात संपन्न झालेल्या उपक्रमाची सांगता तोरणागड येथील धम्माल सहलीने झाली.** (तपशील पान क्र. २० वर) तुम्ही देखील अभिव्यक्त होण्याच्या विविध संधी घेत क्रमिक शिक्षणाबरोबर वैविध्यपूर्ण अनुभव मिळवा, समृद्ध व्हा!

तुमची,
**शिल्पाताई**

**मनोगत**

'नवनिर्मितीचा, सर्जनशीलतेचा आनंद खूप मोठा असतो!' असं म्हटलं जातं. आत्तापर्यंत केवळ ऐकलेली ही उक्ती, आम्हाला प्रत्यक्ष अनुभवता आली ती छात्र प्रबोधनच्या 'विद्यार्थी विशेषांका'च्या निमित्ताने! उन्हाळ्याच्या सुट्टीत 'छात्र प्रबोधन'च्या रूपाने काहीतरी वेगळं करण्याची संधी मिळाली आणि आम्ही सज्ज झालो. या विशेषांकाच्या निमित्ताने 'विद्यार्थ्यांमधल्या वेगवेगळ्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा' हा उद्देश असल्यामुळे आम्ही *गुगल* फॉर्मद्वारे मुलांकडून साहित्य आणि चित्रं मागवली आणि तुमच्यापैकी अनेक जणांनी त्याला भरघोस प्रतिसाद दिला. इतक्या वैविध्यपूर्ण साहित्यातून निवड करणं आम्हाला फार कठीण गेलं. यानिमित्ताने आम्ही अनेक विद्यार्थी, कवी, लेखक, चित्रकारांशी जोडले गेलो.

ठरवलेलं साहित्य गोळा करण्यापासून छपाईपर्यंतचा मासिकाचा प्रवास आम्ही अगदी जवळून बघितला; नुसता बघितला नाही, तर त्यात सक्रिय सहभागही घेतला. आम्ही तिघं एकत्र आलो, चुकलो-शिकलो आणि त्यातून समृद्धदेखील झालो. या साऱ्या प्रक्रियेमध्ये संपादकीय विभागातील शिल्पाताई, वैशालीताई यांची खूप मदत झाली. माधवीताईंनी अंक निर्मितीबद्दलच्या बारीक-सारीक तांत्रिक बाबी समजावून सांगितल्या. महेन्द्रभाईंनीदेखील आम्हाला मार्गदर्शन केलं. विभागातील सर्व ताईंनी आम्हाला प्रेमानं सामावून घेतलं.

विद्यार्थी विशेषांकाच्या निमित्ताने आम्ही 'ज्ञान प्रबोधिनी'शी जोडले गेलो, हे आमचं भाग्यच! परंतु केवळ या अंकापुरतंच नाही; तर भविष्यात ज्या उपक्रमांद्वारे शक्य असेल त्या उपक्रमांद्वारे आम्ही हा धागा नक्की जपू! अशा या आनंददायी प्रवासानंतर हे मासिक सादर करताना खरंच खूप समाधान वाटतंय! या अंकाच्या निर्मितीच्या निमित्ताने जसं आम्ही समृद्ध झालो, तसंच हा अंक वाचून तुम्हीही समृद्ध व्हाल, असा विश्वास आहे! हा अंक कसा वाटला ते आम्हाला नक्की कळवा!

**तुमचे दोस्त - ईशानी, स्वामिनी, मेधज**

**ओळखा पाहू : कोकणातून आला एक भट, त्याला धर की आपट...**

वार्षिक देणगीदार - ➢ वाच. अजित कानिटकर, पुणे ➢ श्री. प्रसाद सांडभोर ➢ सौ. सुचेता सोनी ➢ सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे ➢ सौ. स्मिता चावरे, ऐरोली, नवी मुंबई ➢ सौ. रजनी सोहनी, पुणे

# नव्या युगातील 'इ-जंगल'

– चि. सर्वेश बकाल

**जंगल आता पूर्वीसारखं 'जंगल *यस्टरडे*' राहिलं नव्हतं. ते आता पार 'इ-जंगल' झालं होतं. *सोशल नेटवर्किंगचा व्हायरस* सगळ्यांना चावला होता. जेव्हा सर्वच देश *टेक्नोसॅव्ही* झाला, तेव्हा पेहलवानपूरमध्ये देखील इंटरनेट सेवा सुरू झाली आणि आमच्या जंगलाला फुकटची '*वाय फाय*' *कनेक्टीव्हीटी* मिळाली. याचा परिणाम काय झाला ते तुम्हीच वाचा...!**

सेल्युराम डोक्यावर सामानाची पेटी घेऊन पेहलवानपूरच्या दिशेने निघाला. पाठीवरच्या *सॅकमधल्या टिफिन बॉक्सचा* खमंग वास सुटला होता. *सॅकच्या* बाहेरच्या बाजूला असणाऱ्या जाळीच्या कप्प्यातून पाण्याची बाटली डोकावत होती. बाहेरगावी जाताना सेल्युराम कटाक्षानं घरचं *ॲक्वागार्डचं* पाणी वापरत होता. तसं फार पूर्वीपासूनच सेल्युरामचं घराणं या आठवडी बाजाराच्या *बिझनेसमध्ये* होतं. त्यांच्या सात पिढ्या ढोलकपूरात राहिल्या होत्या. सेल्युरामचे आजोबा सखाराम रोजच्या-रोज ढोलकपूर-पेहलवानपूर *अपडाऊन* करायचे. डोक्यावर भलीमोठी पेटी घेऊन गावोगावी 'टोप्या' विकण्याचा त्यांचा '*पुश्तैनी*' धंदा होता. सखारामतात्यांनी त्यांच्या *बिझनेसवर्ल्डमध्ये* मोठं नाव कमावलं होतं. सेल्युरामचे वडील साईराम हेसुद्धा लोकांना टोप्या घालण्याचा, *सॉरी*



*सॉरी*... विकण्याचा धंदा करीत होते; पण हळूहळू या धंद्यात काही 'राम' राहिला नाही. आता पाळी सेल्युरामची होती. *मोबाइलचा* जमाना होता म्हणून त्यानं धंद्याचा ट्रॅक बदलला. टोप्या विकायचं सोडून सेल्युराम आता *मोबाइल हॅण्डसेट* विकू लागला. या धंद्यानं मात्र सेल्युरामला चांगला हात दिला. ''आपल्याकडे ग्राहक यायची वाट बघण्यापेक्षा आपणच ग्राहकांपर्यंत पोहोचलो तरच धंदा चालतो,'' ही त्याच्या आजोबांची शिकवण होती. आता तर काय जोडीला *सीमकार्ड, अॅक्सेसरीज, अॅप्स* यांची पण तुफान चलती होती. *'धंदे के ट्रॅक पे'* सेल्युरामची गाडी जोरात धावत होती.

तर हा सेल्युराम आपला ढोलकपूरहून पेहलवानपूरकडे आठवडी बाजाराच्या *बिझनेस टूरसाठी* निघाला होता. रस्त्यात एक मोठं जंगल होतं. *हॅण्डसेटचा इअरफोन* त्याने कानात घातला आणि *आस्ते-आस्ते* तो जंगलाच्या रस्त्यानं निघाला. हे बरं होतं, कानात ही *डाऊनलोडेड* 'गुणगुण' असली की, डोईवरचा ओझ्याचा भार हलका होई. बघताबघता तो जंगलाच्या मध्यावर असणाऱ्या मोठ्या वडाच्या झाडाखाली पोहोचला. हे झाड फार *पुश्तैनी* होतं. याच झाडाखाली त्याचे आजोबा, वडील वगैरे मंडळी विश्रांती घ्यायचे.

सेल्युरामनेही दमलेल्या पायांना विश्रांती द्यायची ठरवलं. *सॅकमधील* फुगवायची उशी त्याने काढली; त्यात हवा भरली आणि समाधानानं ती डोक्याखाली घेऊन तो *बिझनेस* मोठा होण्याची स्वप्नं डोळे मिटून बघू लागला. अर्ध्या-एक तासानं त्याच्या *मोबाइलचा अलार्म* वाजला आणि त्याने डोळे उघडले. बघतो तर काय? 'हे असले बघण्याआधी माझ्या डोळ्यांची *स्क्रीन* तडकली का नाही,' असं त्याला वाटू लागलं. त्याची *मोबाइल हॅण्डसेटची* पेटी सताड उघडी होती. पेटीतले सगळे *हॅण्डसेट* गायब होते.

सेल्युरामने मान वर केली, तर झाडावर काळतोंड्या माकडांचा तांडा उंडारत होता. प्रत्येकाच्या हातात एक *हॅण्डसेट* आणि कानात *इअरफोन* टोचलेली मर्कटसेना जाम चेकाळली होती. एकमेकांना टाळ्या देत होती. सेल्युरामच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा येणार होत्या; पण लवकरच तो सावरला. तेव्हा त्यानं पूर्वजांचं स्मरण केलं.

जमिनीवरचे खडे वानरांच्या दिशेने हाणले. लगेच वानरांचा *रिप्लाय* आला. त्याच्यावर वडाच्या लालचुटुक फळांचा जोरदार मारा झाला. जाम सडकून निघालेल्या सेल्युरामने मग जमिनीवरची पडलेली फांदी वानरांच्या दिशेने मारली, तर लगोलग त्याच्यावर वडाच्या डहाळ्यांचा पाऊस पडला. त्यानं धंद्याचं गणित मांडलं. आपला एक *मोबाइल* गेला तरी चालेल; पण वरचे *मोबाइल* परत मिळायला पाहिजेत. अखेर मनाचा हिय्या करून त्याने आपला *मोबाइल* धाडकन जमिनीवर आपटला. गल्लीत *क्रिकेट* खेळताना *सिक्सर* मारल्यावर जशी एखाद्या खिडकीची काच फुटते, तशा त्याच्या मोबाइलच्या ठिकऱ्या झाल्या.

*बडी उमीदसे* त्यानं *रिअॅक्शनची* वाट पाहिली; पण *'व्हॉट अ सरप्राईझ'! देअर वॉज नो रिअॅक्शन अॅट ऑल!* सगळी वानरं आपापल्या *मोबाइलला* चिटकून बसली होती.

**ओळखा पाहू : लोक मला खाण्यासाठी विकत घेतात पण कधीही खात नाहीत...**

वार्षिक देणगीदार - ➢ श्रीमती रंजना कुलकर्णी, सातारा ➢ श्री. अभिजित लिमये ➢ श्री. प्रशांत माने, पुणे
➢ श्री. विक्रम कामठे, पुणे ➢ श्री. मिलिंद बर्वे, पुणे ➢ सौ. सायली मुळये

सगळ्यांनी *यू-ट्यूबवर* मराठी मालिका लावल्या होत्या. सगळे ती सखाराम टोपीवाल्याची एकच गोष्ट पाहात होते. तेवढ्यात 'छोटा भीम'मधील 'जग्गू' *बंदरसारखं* एक माकड खाली आलं आणि म्हणालं, ''नुसते *हॅण्डसेट्स* विकण्यापेक्षा त्यात काय दडलंय याकडे लक्ष दे! या *यूट्यूबवर* सगळं काही मिळतं. तेव्हा *बाबूजी जरा बचके रहो। तुम्हें अभी बहुत कुछ सिखना है सेल्युराम। सो बेटर लक नेक्स्ट टाईम! बाऽऽय.''*

खिन्न मनाने सेल्युरामने *मोबाइलच्या* ठिकऱ्या उचलल्या आणि हताश होऊन तो परत ढोलकपूरच्या *सर्व्हिस सेंटरकडे* निघाला...!

***

**– चि. सर्वेश बकाल** (इ.१० वी)
बाल शिवाजी शाळा, अकोला
**चित्रकार : चि. अनुराग शेगोकार** (इ. ९ वी)

**अवश्य वाचा**
**विज्ञान कथा**
**पुनर्जन्म**
**ले.– चि. पराग चितळे, पुणे** (इ. १० वी)


कविता

# व्यथा चित्त्याची!

'नामिबिया'च्या जंगलातून, आला एक प्राणी,
शोधू लागला आसपास, दिसते का कुणी?
भावंडं शोधूनही सापडेना,
म्हणून वणवण भटकला,
अखेर तो 'कुनो'च्या जंगलात पोहोचला.
'कुनो' म्हणजे, आपले स्वप्नच त्याला भासले,
सांबर, चिंकारा, काळवीट,
शिकारीसाठी गवसले!

पोट भरल्यानंतर, निवांत जरा बसला,
एक विचार तेवढ्यात त्याच्या मनात आला...
'माणसाचं मन जपणारा हा देश
प्राण्यांच्या जीवावर का उठला?'
काय दुर्बुद्धी झाली आणि
प्राणी – शिकारीच्या नादी लागला...

माझी अख्खी प्रजातच नामशेष झाली,
पण सुदैवाने मलाच इथे आणण्याची
त्यांना सुबुद्धी झाली!
राहीन म्हणतो आता इथेच
घेईन छान पाहुणचार,
येणाऱ्या पिढ्यांना तरी माझ्या रूपाने
चित्त्याचे दर्शन नक्की होणार!



**– चि. सोहम खपली** (इ. ७ वी)
बाल शिवाजी शाळा, अकोला
**चित्रकार :** कु. दिव्या पंडित (इ. ११ वी)

गुरु निधान, गुरु मोक्ष, गुरु सर्वांचा आसरा । गुरुसमान नाही सोयरा, गुरुवीण नाही थारा ।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सचिन गाडगीळ, पुणे ➢ श्री. समीर गांधी, बेंगळुरु ➢ श्री. ओंकार चांदोरकर ➢ श्री. श्रीकृष्ण करंदीकर ➢ श्री. अजय फाटक, पुणे ➢ श्री. अरविंद परांजपे, पुणे





ललित

# पक्ष्यांच्या जगाची सफर-'बर्ड रेस'!

– कु. ईशानी फडके

**'बर्ड रेस' म्हणजे पूर्वनियोजित कालावधीमध्ये जास्तीत जास्त पक्ष्यांचा अभ्यास करणं. ही स्पर्धा सूर्य उगवल्यापासून सूर्य मावळेपर्यंत सुरू असते. पायी जाऊन एका ठरलेल्या भागातील पक्ष्यांची जैवविविधता बघणं, तिच्या नोंदी करणं, तसंच जास्तीत जास्त प्रजाती एकाच दिवसात पाहणं आणि त्यांची संख्या टिपून ठेवणं, हा *बर्ड रेसचा* मुख्य उद्देश असतो.**

लहानपणापासूनच मला पक्षिनिरीक्षणाची आवड आहे. ही आवड २०१९ सालच्या मे महिन्यात अधिकच वाढली. उन्हाळ्याची सुट्टी सुरू होती. 'काय नवीन करू या?' असा प्रश्न पडताक्षणी *'बर्ड रेस'* हा प्रकल्प मनात आला.

*बर्ड रेसच्या* निमित्ताने अनेक लोक पहिल्यांदाच पक्षिनिरीक्षण करतात. ही स्पर्धा असल्यामुळे बरीच पूर्वतयारीही करून येतात! या निमित्ताने पक्ष्यांच्या प्रजातींची ओळख तर होतेच; पण त्याचबरोबर पायी चालत असल्यामुळे झाडं, प्राणी आणि त्यांचा पक्ष्यांबरोबरचा परस्परसंबंध यांचाही अभ्यास करता येतो.

आम्ही आमचा बर्ड रेस उपक्रम कोल्हापूर जिल्ह्यातील 'आंबा घाट' परिसरात करायचं ठरवलं. प्रमोददादा (प्रमोद माळी)म्हणजे आंब्यातील स्थानिक पक्षिनिरीक्षक आणि निसर्ग-अभ्यासक आमच्या मदतीला होता. कुठली ठिकाणं बघायची, सध्या कोणते पक्षी कुठं असतील, कोणते पक्षी कोकणातून घाटावर आलेत? ह्या सगळ्याचा विचार केला.

वेगवेगळ्या अधिवासात वेगवेगळे पक्षी दिसतात हे लक्षात घेऊन निरीक्षणासाठी आम्ही चार ठिकाणं निवडली–

**१) देवराई** – एखाद्या देवालयाच्या आजूबाजूचं राखीव जंगल म्हणजे देवराई. घनदाट जंगलामधून जाणारा एक छोटा रस्ता आंबा गावातल्या अंबेश्वराच्या देवळापर्यंत पोहोचतो. इथे माणसांचा वावर कमी असतो. या परिसरात घुबडांचे विविध प्रकार आढळतात.

**ओळखा पाहू : पाणी नाही, पाऊस नाही, रान हिरवेगार... कात नाही, चुना नाही, तोंड लालेलाल...**

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. शशिकला उपाध्ये, चंद्रकला प्रकाशन, पुणे ➢ सौ. सुनिता जयंत देगावकर, पुणे ➢ श्री. अमित गद्रे, पुणे
➢ डॉ. गीतांजली व डॉ. सिद्धार्थ पटवर्धन ➢ सौ. नंदिता गाडगीळ, पुणे ➢ एक हितचिंतक, पुणे

**२) सडा –** म्हणजे एक पठार. *ओरीएंटल स्कायलार्क, कॉमन केसट्रल, व्हाईट शोल्डर्ड काईट* हे इथे हमखास दिसणारे पक्षी.

**३) मानोली जंगल –** हे मानोली धरणाच्या लगतचं सदाहरित वृक्षांचं जंगल आहे. जंगलात पाणवठे तयार केले आहेत. अगदीच नशीबवान असाल तर इथे कधीतरी रानडुक्कर, सांबर, गवा, बिबट्यासुद्धा दिसू शकतो. हे जंगल पुढे चांदोली अभयारण्याला मिळते.

*'इ-बर्ड'* नावाच्या संकेतस्थळावरून आम्ही आंबाघाट परिसरात दिसलेल्या पक्ष्यांच्या आत्तापर्यंतच्या नोंदींचा अभ्यास केला. काही निसर्गप्रेमी, पक्षिनिरीक्षक, निसर्ग छायाचित्रकार जमले. आणि आम्ही दुर्बीण आणि कॅमेरा घेऊन बाहेर पडलो.

देवराईकडे जाताना शिपाई बुलबुल (रेड *व्हिस्कर्ड* बुलबुल), मैना, वेडा राघू *(बी- ईटर)*, सातभाई (जंगल *बॅब्लर)*, धोबी *(वॅग्टेल)* असे सामान्यतः दिसणारे पक्षी दिसले. जशी-जशी देवराईजवळ आली तशा-तशा जंगल *फाऊलच्या* खुणा, शामाची अत्यंत गोड शीळ आणि तांबट *(कॉपरस्मिथ बार्बेट)* ने धरलेल्या तालाने आमचं स्वागत केलं.

*'बर्ड रेस'च्या* पुढच्या भागात (मानोली जंगल) आम्हाला *कॅनरी फ्लायकॅचर, व्हर्डीटर फ्लायकॅचर, हरियाल,* ब्लॅक नेप्ड *मोनार्कसारखे* पक्षी दिसले. बघता बघता तब्बल ६० प्रजातींची नोंद झाली.

*'बर्ड रेस'* म्हणजे पक्ष्यांच्या मागे नुसतं धावणं नाही; तर एरव्ही दिसणारा एखादा पक्षी आज परत का दिसला किंवा का दिसला नाही, याची कारणं समजून घेणं. 'हा' पक्षी शेवटचा 'ह्या' भागात कधी दिसला? तो आता कुठं असेल? त्याची पिल्लं असतील का? कुठल्या झाडावर असतील? त्या झाडावरच का असतील? ते झाड कुठं सापडतं? त्या झाडाच्या आजूबाजूला कुठली झाडं आढळतात? त्यावर कोणते पक्षी असतात?...असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात आणि आपण त्यांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करू लागतो.

*'बर्ड रेस'* हा एक समृद्ध करणारा अनुभव असतो. सातत्याने निसर्गाच्या सान्निध्यात राहिल्यावर आपला आणि निसर्गाचा एक संवाद सुरू होतो आणि खूप काही शिकवून जातो, हे मला जाणवलं.

तुम्हीही एखादा 'बर्ड *रेस'* उपक्रम सहज ठरवून करू शकता. अगदी आपल्या घराजवळच्या पक्ष्यांचं निरीक्षण म्हणजे देखील 'बर्ड *रेस'च!* तुमच्या घराजवळच्या परिसरात कुठले-कुठले पक्षी आहेत याची माहिती *बर्डस ऑफ* पुणे, *बर्डस ऑफ* महाराष्ट्र सारख्या फेसबुक गटावरून मिळवा आणि पक्षिनिरीक्षणाचा आनंद घ्या! आणि हो, तो अनुभव कसा होता, हे 'छात्र प्रबोधन'ला कळवायला विसरू नका!

***

**– कु. ईशानी फडके** (इ. १० वी)
५०६, स्प्रिंगनेस्ट, जावळकर
उद्यानाशेजारी, कर्वेनगर, पुणे 411052

**जरूर पाहा**
**बर्ड रेसच्यावेळी टिपलेली काही पक्ष्यांची प्रकाशचित्रे!**

**अधिक माहितीसाठी खालील पुस्तके वाचा**

1) Birds of the Indian Subcontinent - Richard Grimmett, Carol Inskipp, Tim Inskipp

2) Book of Indian Birds- Dr. Salim Ali


वार्षिक देणगीदार - ➢ सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन ➢ ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे
➢ श्री. विश्वासराव कचरे, तेलंगवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर ➢ श्री. प्रमोद सी. पेठे, पुणे

# अभिनयाच्या क्षेत्रातील मुशाफिरी!

***'लाईट्स, कॅमेरा, साऊंड, ॲक्शन!'*** **हे वाचलं की आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो, तो म्हणजे एखाद्या चित्रपटाचा *शूटिंग सीन.* अभिनयाच्या या दिमाखदार क्षेत्राचं आपल्या सर्वांनाच आकर्षण वाटतं; जेव्हा आपल्यातलाच एखादा मुलगा या क्षेत्रात जातो, तेव्हा त्या मुलाबद्दल कुतूहल जागृत होतं. चि. मिहीर गोडबोले या सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण करत वेगवेगळ्या जाहिराती आणि *वेबसिरीजमध्ये* अभिनय केला आहे. मिहीरला आलेले हे *कॅमेऱ्यामागचे* अनुभव जाणून घेऊ या!**



चि. मिहीर गोडबोले

**प्रश्न : तू पहिल्यांदा अभिनय केव्हा केलास? तुझी या क्षेत्राशी ओळख कशी झाली?**

**उत्तर :** अभिनय क्षेत्राशी पहिली ओळख झाली तेव्हा मी पाच-सहा वर्षांचा असेन. जवळपास बऱ्याच अभिनेत्यांसाठी नाटक हा त्यांचा पहिला *प्लॅटफॉर्म* असतो. तसाच तो माझ्यासाठीसुद्धा होता. त्यावेळी मी शाळेच्या *'अग्ली डकलिंग'* या नाटकात मुख्य भूमिका केली होती. त्या नाटकात काम करताना मी पहिल्यांदा *स्टेजवर* पाऊल ठेवलं.

**प्रश्न : त्या नाटकाच्या वेळचे काही किस्से सांगशील का?**

**उत्तर :** तेव्हाचा अनुभव खरंतर मजेशीरच आहे. आधी सांगितलं त्याप्रमाणे मी फक्त पाच-सहा वर्षांचा होतो. त्यामुळे मी साकारत असलेली बदकाच्या कुरूप पिल्लाची भूमिका फारच मनावर घेतली; इतकी की, त्या कुरूप पिल्लाच्या पात्राला इतर पात्र जे काही बोलायची ते सगळं मला खरंच वाटायचं. मग मला भीती वाटायची, वाईट वाटायचं; पण आता या गोष्टीचा पुन्हा विचार करताना माझं मलाच हसू येतं.

**प्रश्न : तुझा नाटकापासून सुरू झालेला प्रवास आता *टीव्हीपर्यंत* आला आहे. त्याची सुरुवात कशी झाली?**

**उत्तर :** मी पहिली *ऑडिशन* एका जाहिरातीसाठी दिली होती. तेव्हा माझी निवड झाली नाही. त्यानंतर मी *'बोर्नव्हिटा बिस्किट्स'च्या* जाहिरातीसाठी *ऑडिशन* दिली आणि त्या जाहिरातीसाठी मला निवडलं गेलं. त्या जाहिरातीमध्ये मला एका छोट्या मुलाचं काम मिळालं होतं. त्यानंतर मी 'डाबर बबूल', *'सॅव्हलॉन'* अशा कंपन्यांच्या जाहिरातींमध्येसुद्धा काम केलं.

**प्रश्न : त्या जाहिरातींचं *शूटिंग* करताना काय काय अनुभव आले?**

**उत्तर :** *शूटिंगचा* सगळा *सेटअप* बघून अर्थातच सुरुवातीला दडपण आलं; पण नंतर मला मजा आली. या क्षेत्रामध्ये मी नवीन होतो, मला इथल्या कामाच्या पद्धतीची, प्रक्रियेची माहिती नव्हती. तेव्हा माझ्या तोंडी जे संवाद होते, त्यांची पुन्हा-पुन्हा उजळणी *सेटवर* करून घेतली गेली. मी तर सगळं बरोबर म्हणत होतो; पण तरीही *रिटेकवर रिटेक* चालले होते; माझंच काहीतरी चुकतंय असं

वाटू लागलं. मी अगदी रडकुंडीला आलो होतो! पण रात्री जेव्हा अखेर *शॉट* 'ओके' होऊन शूट संपलं, तेव्हा कुठं मला हायसं वाटलं! एक-दीड मिनिटाच्या जाहिरातीसाठी किती कसून मेहनत घ्यावी लागते, ते लक्षात आलं. कमीतकमी वेळात त्या वस्तूबाबतचा *(प्रॉडक्ट)* जास्तीत जास्त आशय दर्शकांपर्यंत पोहोचवण्याचं, वेगळंच आव्हान जाहिरातींमधून असतं, हे कळून चुकलं.

**प्रश्न : जाहिरातींबरोबरच तू *वेबसिरीजमध्येही* काम करतोस. सध्या तुझं कोणतं काम सुरू आहे?**

**उत्तर :** हो. आत्ता सध्या तीन *वेबसिरीजमध्ये* माझ्या भूमिका आहेत. दोन हिंदी *वेबसिरीजमध्ये* माझी छोटाशी भूमिका आहे आणि एका मराठी *वेबसिरीजमध्ये* मी मुख्य भूमिका करतोय.

**प्रश्न : या *वेबसिरीजबद्दल* काही सांगशील का?**

**उत्तर :** नुकतीच माझी *'स्कूल ऑफ लाईज्'* नावाची हिंदी *वेबसिरीज* प्रदर्शित झाली आहे; पण बाकीचे *प्रोजेक्ट्स* अजून प्रदर्शित झाले नसल्यामुळे मी त्यांच्याबद्दल काही सांगू शकत नाही. मी फक्त एवढंच म्हणेन की, लवकरात लवकर त्या मालिका तुमच्या भेटीला येतील.

**प्रश्न : *शूटिंगला* जाण्यापूर्वी तुला काही प्रशिक्षण किंवा कार्यशाळा करावी लागली का?**

**उत्तर :** नाही, वेगळे प्रशिक्षण किंवा कार्यशाळा असं काही नव्हतं. ज्या काही सूचना किंवा मार्गदर्शन असेल, ते *सेटवरच* दिग्दर्शक आणि साहाय्यक दिग्दर्शक करत होते. पण आपल्या आवाजाची गुणवत्ता राखण्यासाठी काही नियम, बंधनं स्वत:हून घालून घ्यावी लागतात. तूपकट पदार्थ खायचे टाळावं लागतं. काही वेळा फ्रिजमधलं थंडगार पाणी, सरबत कितीही प्यायची इच्छा झाली तरी; ते पिण्याचा मोह टाळावा लागतो. दही, चिंच, कैरी असे आंबट पदार्थ कधीकधीच खाता येतात. घशाला ताण आला तर गरम पाणी प्यावं लागतं.

**प्रश्न : शाळा, अभ्यास आणि तुझं शुटिंग यांचा मेळ तू कसा साधलास?**

**उत्तर :** मी सिटी इंटरनॅशनल स्कूल, पुणे या शाळेत जातो. शुटिंगमुळे शाळा बुडायची; पण तेथील शिक्षकांचे मला खूप सहकार्य मिळाले. शिवाय अभ्यास बुडू नये म्हणून माझ्या मित्रमैत्रिणींनी मला खूप मदत केली. शाळेतला बुडलेला अभ्यास ते मला पुरवतात. परीक्षेच्या वेळी मी सेटवरच उजळणी करायचो आणि अभ्यासाकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्यायचो. यामध्ये माझ्या आई-बाबांचाही मोठा वाटा आहे.

**प्रश्न : *टीव्हीवर* जेव्हा पहिल्यांदा स्वत:ला पाहिलंस तेव्हा कसं वाटलं? तुझ्या कुटुंबाच्या, मित्रमैत्रिणींच्या प्रतिक्रिया काय होत्या?**

**उत्तर :** स्वत:ला *टी.व्ही.वर* बघून अर्थातच मला खूप आनंद झाला. आई-बाबांना अभिमान वाटेल असं काहीतरी केल्यामुळे मलाही समाधान वाटलं. माझ्या मित्र-मैत्रिणींनादेखील माझ्या कामाचं अप्रूप वाटलं.

**प्रश्न : एखाद्या *शूटिंगच्यावेळी* तुझी कुठल्या कलाकाराशी भेट झाली का?**

**उत्तर :** शूटिंगच्यावेळी मला अभिनेता 'अजय देवगण' यांना भेटता आलं. तो क्षण माझ्यासाठी आनंदाचा होता. त्या भेटीने मी खूप भारावून गेलो होतो. मी अगदीच दोन-तीन वाक्यं बोलू शकलो; पण ही आठवण मी आयुष्यभर जपेन. त्याचबरोबर मराठी नाट्यक्षेत्रातील 'चंद्रकांत कुलकर्णी', 'गीतांजली कुलकर्णी', 'पुष्कराज चिरपुटकर' यांच्यासारख्या मोठ्या कलाकारांशी भेट झाली. त्यांची कामाची पद्धत बघता आली,

ओळखा पाहू : मला पाण्यात पाहू शकता पण तरीही मी ओला नसतो...

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. अमित बागाईतकर, पुणे ➢ श्री. आदित्य करंदीकर, पुणे ➢ श्री. निश्चल गोन्हे, हैद्राबाद ➢ श्री. सचिन जोगळेकर, पुणे ➢ श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु - कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ

त्यांचा आत्मविश्वासपूर्वक वावर बघितला. खूप गोष्टी निरीक्षणातून शिकता आल्या.

**प्रश्न : जाहिराती आणि *वेबसिरीज*शिवाय तू आणखी कशात काम केलं आहेस?**

**उत्तर :** चारुहास पंडित यांच्या सुप्रसिद्ध चिंटूच्या *ऑडिओ-बुकसाठी* मी काम केलं आहे. त्यातल्या चिंटूच्या पात्राला मी आवाज देतो.

**प्रश्न : तुझे छंद काय आहेत?**

**उत्तर :** मला गायन, चित्रकला ह्यांची आवड आहे. याशिवाय मी *पियानोसुद्धा* वाजवतो.

**प्रश्न : तुझ्या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांना तू काय संदेश देशील?**

**उत्तर :** संदेश देण्याइतका मी काही मोठा नाही. अजून खूप काही करून दाखवायचं आहे. मी एवढंच सांगेन की, तुम्हाला मिळालेल्या संधीचा पुरेपूर वापर करा. तुम्ही शंभर टक्के दिलंत तर नक्कीच चांगलं फळ मिळतं. यश-अपयश आपल्या हातात नसतं; पण प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास कामाचं समाधान नक्की मिळतं. दुसऱ्याकडून शिकण्याची तयारी, निरीक्षण, डोळे उघडे ठेवून वावरल्याचा खूप फायदा होतो. भूमिकेसाठी पूरक साहित्याचं वाचन केल्यावर ती भूमिका उत्तम वठवण्यासाठी मदत होते.

**प्रश्न : तुझी पुढच्या वाटचालीसाठी काय स्वप्नं आहेत? तुझं ध्येय काय आहे?**

**उत्तर :** मला अभिनयाची असलेली गोडी जपण्याची इच्छा आहे. अभिनेता होऊन ही कला जोपासण्यातच मला आनंद आहे! 'एखादी महत्त्वपूर्ण भूमिका करायला मिळावी व ती दर्शकांच्या चिरकाल स्मरणात राहावी', हे माझं स्वप्न आहे.

***

**- चि. मिहीर गोडबोले** (इ. ७ वी), पुणे

**- शब्दांकन : स्वामिनी हर्षे** (इ.१२ वी), पुणे

---

करून तर पाहा...

## पिनाकोलाडा

(अननस, नारळाचे दूध व *व्हॅनिला आईस्क्रीमचे मॉकटेल)*



**साहित्य :** एक कप अननसाचे तुकडे, दोन ते तीन चमचे साखर (चवीप्रमाणे), एक कप बर्फाचे तुकडे, एक कप नारळाचे दूध, दोन स्कूप्स *व्हॅनिला आईस्क्रीम*, दीड कप पाणी.

**कृती :** १) *ब्लेंडरच्या* भांड्यात अननसाचे तुकडे, दोन ते तीन बर्फाचे तुकडे, साखर व अर्धा कप पाणी घालून फिरवून घ्या. २) पिनाकोलाडा बनवण्यासाठी *ब्लेंडरच्या* भांड्यातील अननसाचा रस गाळून घेऊन, त्यात नारळाचे दूध, बर्फाचे तुकडे, तीन स्कूप्स *व्हॅनिला आईस्क्रीम* घालून चटकन फिरवून घ्या. ३) तो एका भांड्यात घालून *फ्रीजमध्ये* अर्धा तास थंड होण्यासाठी ठेवा. थंडगार, स्वादिष्ट पिनाकोलाडा तयार आहे. तुमच्या आवडीप्रमाणे सजवा आणि आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर आस्वाद घ्या!

(चित्र : संकेतस्थळावरून साभार)


## विशेष वार्ता

**छात्र प्रबोधनचे २ नवीन ॲप!**

गुगल प्ले स्टोअरवरून **मोफत डाऊनलोड करा!**

१. छात्र प्रबोधन मासिकाचे ॲप :
**Chhatraprabodhan Masik**

२. प्रबोधन ऐपावाकचे ॲप : (ऐका-पाहा-वाचा करा)
**Prabodhan Aipavak**



| Chhatraprabodhan Masik | Prabodhan Aipavak |
|---|---|
| या ॲपवर छात्र प्रबोधनचे इ-अंक पाहू शकाल. | या ॲपवर 'ऐका-पाहा-वाचा-करा'चे संच पाहा! |

**दोन्ही ॲप आजच डाऊनलोड करा!**


एक एक पायरी, चढावी ज्ञानमंदिराची। मनी आठवण नित्य असावी, श्री गुरुचरणांची ।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. मुकुंद भास्कर कुवर, बोरीवली, मुंबई ➢ श्री. किरण सावरगावकर, पुणे ➢ श्री. संदीप धांडे, पुणे ➢ श्री. केदार वसंत जोशी, पुणे ➢ मुद्देबिहाळकर परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!

# ॥ शब्दशोध ॥

**आषाढ शुद्ध पौर्णिमा म्हणजेच गुरुपौर्णिमा! याच दिवशी महर्षी वेदव्यासांची जयंती साजरी केली जाते. महर्षी व्यास म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर 'महाभारत' हे महाकाव्य येतं. त्याच महाभारतातील विविध पात्रे, स्थळे यांची नावे खाली दिलेल्या चौकटीत आडव्या, उभ्या ओळींमध्ये लपलेली आहेत. खाली दिलेल्या संकेतांच्याआधारे ती नावे शोधून त्यांना कडी करा.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | न | रा | पां | शि | शि | शु | पा | ल | गां | डी | व |
| सं | कृ | पा | चा | र्य | खं | मु | ना | ग | धा | अ | लु |
| की | ष्ण | थ | ल | फो | डी | अ | ठ | रा | र | श्व | ऋ |
| क्ष | द्वै | ध | मा | वि | लो | भि | मे | ज | धृ | त्था | थ |
| सं | पा | न | र | पि | ता | म | ह | सू | त | मा | का |
| ज | य | द्र | थ | मि | र | न्यू | स्ति | य | रा | भ | नी |
| य | न | न | वि | रा | ट | ज | ना | म | ष्ट्र | पौं | षा |
| स्वा | ज्ञा | प | रि | क्षि | त | रें | पू | दा | नी | ड्र | त |
| रा | हि | इं | सा | मा | नि | दुः | र | मा | द्री | क | ग |
| धे | न्यो | द्र | उ | त्त | रा | श | द्र | ज्यु | सू | नी | ण |
| य | क्ष | प्र | श्न | मं | र | ला | क्षा | गृ | ह | ने | प |
| ई | द | स्थ | ही | वि | दु | र | शा | स | त्य | व | ती |

(उत्तरे अन्यत्र)

**या संकेतांच्याआधारे (क्लृप्ती) शब्द शोधा :** १) द्रौपदी या राज्याची राजकन्या २) अम्बाचा अवतार ३) शकुनीचे राज्य ४) व्यासांचे खरे नाव ५) अर्जुनाचे दुसरे नाव ६) द्रोणपुत्र ७) युद्धाच्या तेराव्या दिवशी पांडवांकडून लढताना मरण पावलेला योद्धा ८) युधिष्ठिराने केलेला यज्ञ ९) अम्बिकेचा पुत्र १०) धृतराष्ट्राचा सारथी ११) पुराणकाळातील वाहन १२) कुरू राजधानी १३) भीमाच्या शंखाचे नाव १४) पांडवांची राजधानी १५) कर्णाचे दुसरे नाव १६) पांडव अज्ञातवासात या नगरीत राहिले १७) कौरवांची बहीण १८) महाभारत कोणाच्या हस्ते लिहिले गेले आहे? १९) कृष्णाचा आत्ते भाऊ २०) अर्जुनाचे धनुष्य २१) कौरवांचे राजगुरू, सात चिरंजीवांपैकी एक २२) गीतेचे एकूण अध्याय २३) भीष्मांची उपाधी २४) कर्ण : --पुत्र २५) पांडू राजाची पत्नी २६) हा सूर्य हा ----
२७) युधिष्ठिरानंतरचा राजा २८) कौरवांचा महामंत्री २९) विराट राजाची कन्या ३०) युधिष्ठिराने अचूक-उत्तरे दिलले प्रश्न ३१) लाखेपासून बनवलेला पांडवांचा राजवाडा ३२) व्यासांची माता

सौर आषाढ, शके १९४५/जुलै २०२३ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० आषाढ, शके १९४५/१ जुलै २०२३
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023
Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-7-2023



**कुमारांच्या कुंचल्यातून साकारलेले चित्र!** – **कु. अदिती चानसीकर** (इ. ८वी), नाशिक

**सौर दिनदर्शिका शके १९४५**

| | सौर आषाढ श्रावण | जुलै २०२३ |
|---|---|---|
| श. | आ.१० | 1 |
| र. | ११ | 2 |
| सो. | १२ | 3 |
| मं. | १३ | 4 |
| बु. | १४ | 5 |
| गु. | १५ | 6 |
| शु. | १६ | 7 |
| श. | १७ | 8 |
| र. | १८ | 9 |
| सो. | १९ | 10 |
| मं. | २० | 11 |
| बु. | २१ | 12 |
| गु. | २२ | 13 |
| शु. | २३ | 14 |
| श. | २४ | 15 |
| र. | २५ | 16 |
| सो. | २६ | 17 |
| मं. | २७ | 18 |
| बु. | २८ | 19 |
| गु. | २९ | 20 |
| शु. | ३० | 21 |
| श. | ३१ | 22 |
| र | श्रा.१ | 23 |
| सो. | २ | 24 |
| मं. | ३ | 25 |
| बु. | ४ | 26 |
| गु. | ५ | 27 |
| शु. | ६ | 28 |
| श. | ७ | 29 |
| र. | ८ | 30 |
| सो. | ९ | 31 |

सभासदांनी आपले व्हॉटस्‌अॅप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०१११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहोचवता येईल.

छात्र प्रबोधद्वारा प्रकाशित **दिनदर्शिकेतील जुलै महिन्याचे पान** पाहाण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा!

**सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी : ₹ २५०/-**
ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी :
**www.jpprakashane.org**

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे, ही आग्रहाची, प्रेमळ विनंती.

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन